Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
**NAAC Re-accredited A Grade**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे अ दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
Director : (0240) 2403201
Office : (0240) 2403178 / 199
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.ac.in

**Office : Director, Board of Examination & Evaluation**
**कार्यालय : संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

संदर्भ क्र. परीक्षा/२०२२-२३/864 दिनांक : ०३.०१.२०२३

## महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजनाबाबत पत्र

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

विषय : "पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ" आयोजनासंबंधी..
संदर्भ : (१) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. परीक्षा/२०२०/८६९ दिनांक १२.०२.२०२०
(२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. परीक्षा/२०२०/९१९ दिनांक ११.०३.२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब दिनांक १० ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील २०१८ चा एकरूप परिनियम क्रमांक ४ मधील क्रमांक (३)(८) मधील तरतूदीनुसार वरील संदर्भीय परिपत्रक क्र. १ अन्वये विद्यापीठास संलग्न असलेल्या महाविद्यालयात "पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ" मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करुन आयोजन करावे असे कळविण्यात आले होते.

तथापि, कोव्हिड-२०१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाने महाविद्यालयात कोणतेही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊ नयेत असे निर्देश जाहीर केल्यामुळे या कार्यालयाचे वरील संदर्भीय परिपत्रक क्र. २ अन्वये पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजनास स्थगिती देण्यात आलेली होती.

करिता, याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, एकरूप परिनियम ४ मधील तरतूदीनुसार महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. महाविद्यालयनिहाय व अभ्यासक्रमनिहाय पदवी प्रमाणपत्र विद्यापीठाच्या पदवी प्रदान कक्षातून खास दुतामार्फत हस्तगत करुन घ्यावीत, ही विनंती.

यासंबंधी दिनांक १२.०२.२०२० रोजीच्या परिपत्रक व सोबतच्या मार्गदर्शक तत्त्वाचे पालन करण्यात यावे, ही विनंती.

सोबत : १. दिनांक : १२.०२.२०२२ रोजीचे परिपत्रक
२. दिनांक ११.०३.२०२० रोजीचे परिपत्रक
३. मार्गदर्शक तत्त्वे.

आपला विश्वासू,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-Accredited A

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे "अ" दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
Director : (0240) 2403201
Office : (0240) 2403178/199
Website : www.bamu.net
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.net

**Office of the Director**
**Board of Examinations & Evaluation**
कार्यालय, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र परीक्षा/२०२०/869 दिनांक : १२.०२.२०२०

# परिपत्रक

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब दिनांक १० ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील २०१८ चा एकरूप परिनियम क्रमांक - ४ मधील क्रमांक (३) (८) अन्वये विद्यापीठास, संलग्न महाविद्यालय अथवा संचलित महाविद्यालय अथवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांना त्यांच्या विद्यार्थ्यांना त्यांच्यावतीने अशाप्रकारे नियत केलेल्या दिनांकास पदव्या प्रदान करण्याच्या प्रयोजनार्थ, पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करण्याचे काम नेमून देण्याचा अधिकार असेल :

परंतु, असा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ, विद्यापीठाने आयोजित केलेल्या दीक्षांत समारंभानंतर एका महिन्याच्या आत, सलग्न महाविद्यालयाकडून अथवा संचलित महाविद्यालयाकडून अथवा मान्यताप्राप्त परिसंस्थेकडून, आयोजित करण्यात येईल.

वरील एकरूप परिनियम क्र.४ मधील तरतूदीच्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ०४.०२.२०२० रोजीच्या बैठकीत प्रस्ताव क्र. ६ वरील निर्णयानुसार Graduation Ceremony at College Level आयोजित करण्याबाबत मागदर्शक तत्त्वे सूचना मान्य करण्यात आलेल्या आहेत. सदरील मार्गदर्शक तत्त्वे/सूचना सोबत परिशिष्ट-अ जोडण्यात येत आहे. सदरील परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यास कसूर केल्यास, तसेच निर्धारित वेळेत सदरचा समारंभ आयोजित न केल्यास, रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त) शास्ती लावण्यात येईल, असा निर्णय व्यवस्थापन परिषदेने पारित केला आहे.

सबब, सर्व संबंधितांनी याची नोंद घेण्यात येऊन परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी,

स्वाक्षरीत/-
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

याची एक प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित:

१. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# महाविद्यालयीन पातळीवर आयोजित करावयाच्या पदवी ग्रहण समारंभाविषयी (Graduation Ceremony at College Level) मार्गदर्शक तत्त्वे

- महाविद्यालयीन पातळीवर प्रथमच आयोजित केला जाणारा पदवीग्रहण समारंभ हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील परमोच्च क्षण व समाजमनामध्ये आदरयुक्त भावना निर्माण करणारा समारंभ असल्याने त्याचे पावित्र्य जपण्यात यावे.
- महाविद्यालयीन पातळीवर या पदवीग्रहण समारंभाच्या नियोजनासाठी महाविद्यालयाच्या प्राचायांचे अध्यक्षतेखाली पुढील समिती गठीत करण्यात यावी :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्राचार्य | - | अध्यक्ष |
| २. | उपप्राचार्य | - | सचिव |
| ३. | विद्यार्थी कल्याण अधिकारी | - | सदस्य |
| ४. | राष्टीय सेवाजयोजना अधिकारी | - | सदस्य |
| ५. | राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी (असल्यास) | - | सदस्य |
| ६. | क्रीडा संचालक | - | सदस्य |

- महाविद्यालयातील पदवीप्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे सभागृह किंवा मैदानात या समारंभाचे आयोजन करण्यात यावे.
- समारंभ स्थळी मंचाच्या पाठीमागील पडद्यावर फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इमारतीची व बोधचिन्हाची प्रतिमा प्रदर्शित करण्यात यावी. या व्यतिरिक्त कोणतेही छायाचित्र प्रतिमा अथवा मजकुर सभास्थानी प्रदर्शित करण्यात येऊ नये.
- पदवीग्रहण समारंभाच्या आरंभी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून प्रमुख अतिथी, प्राचार्य, उपप्राचार्य व पदवीप्राप्त विद्यार्थ्यांची मिरवणूक आयोजित करण्यात यावी. या मिरवणूकीच्या अग्रभागी विद्यापीठाचा ध्वज असावा. विद्यापीठाचा ध्वज हा उपप्राचार्य यांनी हाती घ्यावा.
- समारंभाच्या आरंभी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून निघणारी प्रमुख अतिथी, प्राचार्य, उपप्राचार्य व पदवी प्राप्त विद्यार्थ्यांच्या मिरवणूकीचे सभास्थानी आगमन होताच त्यातील सहभागी सदस्य आसनस्थ होईपर्यंत सभागृहातील सर्व उपस्थित प्रेक्षकांनी आपापल्या जागी उभे रहावे व संबंधित मान्यवर आसनस्थ झाल्यावरच आपल्या जावेवर बसावे. सभारंभाचे औचित्य व पावित्र्य जपण्यासाठी हा दंडक कटाक्षाने पाळावा.
- प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करावयाची व्यक्ती ही शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात निस्पृहपणे कार्य करणारी विशेष व्यक्ती असावी.
- समारंभाची बैठक व्यवस्था पुढील प्रमाणे असावी :
  - (अ) मंचावर पहिल्या ओळीत प्रमुख अतिथी, प्राचार्य, उपप्राचार्य व विद्यार्थी संसदेचा सचिव (यु.आर.) LMC चा चेअरमन किंवा त्यांचा प्रतिनिधी
  - (ब) मंचावर दुसऱ्या ओळीत महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक (प्रत्येक विद्याशाखेतील)
  - (क) मंचावर समोर एका बाजुला विभाग प्रमुख, इतर मान्यवर व दुसऱ्या बाजुला माध्यमांचे प्रतिनिधी
  - (क) मंचाच्या समोर एका बाजुला विभाग प्रमुख, इतर मान्यवर व दुसऱ्या बाजुला माध्यमांचे प्रतिनिधी.

...२.

(ड) सभागृहाच्या प्रथम रांगेत विशेष सन्मान, पारितोषिक प्राप्त विद्यार्थी (पदक/पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान विद्यापीठात झालेला असला तरी महाविद्यालय विशेष अभिमानास्पद बाब म्हणून त्यांना निमंत्रित करु शकते)

(इ) विद्याशाखानिहाय व प्राप्त श्रेणीनुसार इतर पदवी प्राप्त विद्यार्थ्यांच्या रांगा क्रमशः बसविण्यात याव्यात.

- पदवीप्राप्त विद्यार्थ्याने पदवीचा स्वीकार करतांना मंचावर फक्त तोच विद्यार्थी जाईल, त्याला आपल्याबरोबर कोणालाही नेता येणार नाही.
  (अ) विशेष पदक, पारितोषिक, प्राविण्य प्राप्त.
  (ब) असमान्य प्राविण्य (वरील 'अ' व्यतिरिक्त)
  (क) विद्याशाखानिहाय व प्राप्त श्रेणीनुसार इतर प्रदवीप्राप्त.
- महाविद्यालयीन पातळीवर आयोजित करावयाच्या पदवीग्रहण समारंभाची कार्यक्रमपत्रिका पुढीलप्रमाणे असावी:
  (१) पदवीग्रहण समारंभाच्या आरंभी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून प्रमुख अतिथी, प्राचार्य, उपप्राचार्य व पदवी प्राप्त विद्यार्थ्यांची मिरवणूक
  (२) मिरवणूकीचे सभास्थानी आगमन व दिपप्रज्वलन
  (३) विद्यापीठ गीत
  (४) स्वागत व प्रास्तविक
  (५) प्रमुख अतिथींचे बीज भाषण
  (६) अध्यक्षीय भाषण
  (७) आभार प्रदर्शन
  (८) पदवी प्रमाणपत्र वितरण
  (९) राष्ट्रगीत
  (१०) पदवीग्रहण समारंभ समाप्तीनंतर वर अ.क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मान्यवरांची मिरवणूक मंचापासून परतीच्या मार्गाने जाईल व त्यानंतर समारंभ अधिकृतरित्या समाप्त होईल. (मिरवणूक परतीच्या वेळी सभागृहातील सर्व प्रेक्षकांनी मिरवणूक सभागृहाबाहेर जाईपर्यंत स्वतःच्या जागेवर उभे रहावे.
- महाद्यिालयाने पदवीग्रहण समारंभात वितरीत केलेल्या प्रमाणपत्रांची विद्याशाखानिहाय नोंद ठेवावी. सदर नोंद प्रतिवर्षी खालील नमुन्यामध्ये अद्यावत करत गेल्यास महाविद्यालयास माजी विद्यार्थ्यांची (Alumni) नोंद ठेवणे सहज शक्य होईल.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | पदवी | पत्ता | दूरध्वनी / भ्रमणध्वनी | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-Accredited A

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे "अ" दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
Director : (0240) 2403201
Office : (0240) 2403178/199
Website : www.bamu.net
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.net

Office of the Director
Board of Examinations & Evaluation
कार्यालय, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र परीक्षा/२०२०/ 919 दिनांक : ११.०३.२०२०

# परिपत्रक

**संदर्भ क्र. परीक्षा/२०२०/८६९ दिनांक १२.०२.२०२०**

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांनी Graduation Ceremony at College Level आयोजित करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि, सद्यस्थितीत राज्यातील व देशातील कोरोना व्हायरस बाबत खबदारीच्या उपायोजना म्हणून महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने महाविद्यालयात कोणतेही कार्यक्रम आयोजित करु नये, जेणेकरुन या कार्यक्रमामुळे होणारी गर्दी व व्हायरसचा प्रादुर्भाव टाळता येईल तसेच विद्यापीठ अनुदान आयोगानेसुध्दा याबाबत स्वतंत्रपणे निर्देश दिले आहेत.

सबब, या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उपरोक्त कारणे महाविद्यालयात आयोजित होणाऱ्या पदवी वितरण समारंभाच्या अंतिम तारखेस शिथिलता देण्यात येत आहे. करिता, पुढील आदेशापर्यंत आपल्या महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेले पदवी वितरण समारंभ व इतर समाारंभ स्थगीत करण्यात यावे, ही विनंती.

सर्व संबंधितांनी याची नोंद घेण्यात येऊन परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

याची एक प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित:

१. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद